# देगलूर महाविद्यालयातील १५ जणांना रोजगाराची संधी

**देगलूर / प्रतिनिधी**

अडत व्यापारी शिक्षण संस्था संचालित देगलूर महाविद्यालयातील प्लेसमेंट विभाग व महाराष्ट्र बॉर्डर चेक पोस्ट नेटवर्क लिमिटेडच्या संयुक्त विद्यमाने ४ जुलै रोजी एकदिवसीय रोजगाराच्या संधी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.मोहन खताळ होते. त्यांनी नवीन शैक्षणीक धोरणानुसार विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख शिक्षण व संधी उपलब्ध करून देणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले. महाराष्ट्र बॉर्डर चेक पोस्ट नेटवर्क लिमिटेडचे राजा एन., निलेश भोसले, पवनकुमार सिंग हे उपस्थित होते.

यावेळी राजा एन. व निलेश भोसले यांनी महाराष्ट्र बॉर्डर चेक पोस्ट नेटवर्क लिमिटेडची भूमिका, कार्यप्रणाली व रोजगाराच्या संधी याबाबतची सविस्तर माहिती दिली. या कार्यशाळेस पदवी व पदव्युत्तर वर्गाचे ७० विद्यार्थी उपस्थित होते. त्यांची बहुपर्यायी स्वरूपाची २० गुणाची परीक्षा घेण्यात आली. तसेच या विद्यार्थ्यांची मुलाखत घेण्यात आली. यात भोईवार विजय सुर्यकांत, शेख अमीर खाजमिया, निलेश माधव वंजारे, शेख बाबु बालेसाब, वाघमारे अश्वजित मारोतीराव, वगलवार साईकृष्ण श्रीनिवास, संदेश भुजंग बिजलीकर, अविनाश मारोती अल्लापुरे, आकाश राजेंद्र भांडे, सिध्दांत लक्ष्मणराव रावीकर, सय्यद आदम हैदर, शिंगाडे सम्यक, अब्दुल जब्बार बेग, सौरभ सोपानराव कळसकर, मोहमद इक्रम मोहमद इस्सार या मुलांची निवड झाली आहे. सदरील विद्यार्थ्यांच्या निवडीबद्दल अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेंबरेकर, शशिकांत चिद्रावार, नारायण मैलागिरे, सुर्यकांत नारलावार, विलास तोटावार, डॉ. कर्मवीर उनग्रतवार, गंगाधर जोशी, राजू महाजन, जनार्दन चिद्रावार, रवींद्र द्याडे, देवेंद्र मोतेवार , चंद्रकांत नारलावार , प्राचार्य डॉ.मोहन खताळ, उपप्राचार्य डॉ.अनिल चिद्रावार, उपप्राचार्य प्रा. उत्तमकुमार कांबळे , कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी समाधान व्यक्त केले आहे.

Scanned with OKEN Scanner